# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक , उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४६१४२०)


जा.क्र.: विससं/उशि/कोविप/महाडीबीटी शिष्यवृत्ती/२०२४-२५/1852 दि.०६.०८.२०२४

**परिपत्रक**

**विषय: उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची सन २०२४-२५ करीता महाडीबीटी पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ: मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्य-२०२४- २५/डीबीटी/, दि.०५.०८.२०२४

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, राज्य शासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन एकत्रितपणे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. **सन २०२४-२५ करिता महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून दि.२५.०७.२०२४ पासून ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा देण्यात आलेली आहे.**

महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या खालील १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

| अ. क्र. | योजनांची नांवे |
|---|---|
| ०१. | राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| ०२. | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| ०३. | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| ०४. | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) |
| ०५. | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर) |
| ०६. | राज्य शासनाची दक्षिणा अधिछात्रावृत्ती |
| ०७. | शासकीय संशोधन अधिछात्रावृत्ती |
| ०८. | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| ०९. | राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| १०. | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ११. | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| १२. | राज्य शासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग - २) |
| १३. | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| १४. | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी सहाय्य व्हावे तसेच महाविद्यालयातील लिपिक व प्राचार्य यांना अर्जांची पडताळणी करणेसाठी सहाय्य व्हावे यासाठी व्हिडीओ मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

➢ **विद्यार्थ्यांना सुचना:-**

०१. उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी https://mahadbtmahait.gov.in/ या लिंकव्दारे महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

०२.शिष्यवृत्तीचे शासन निर्णय, अटी-शर्ती देय लाभ यांचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.

०३. उपरोक्त शिष्यवृत्तींबाबत अद्ययावत माहितीसाठी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे.

०४. विद्यार्थी डी.बी.टी. पोर्टलव्दारे लागू असलेल्या एकापेक्षा अधिक शिष्यवृत्तींसाठी अर्ज भरु शकतात तथापि संबंधित विद्यार्थ्यांस त्यांनी निवडलेल्या Preference नुसार एकच शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार असल्याने शिष्यवृत्तीचा Preference काळजीपूर्वक नोंदविण्यात यावा.

०५. विद्यार्थ्यांनी अर्जासोबत शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व स्पष्ट दिसतील अशी कागदपत्रे जोडणे (अपलोड करणे) आवश्यक आहे.

०६. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये गुण नोंदवितांना ते टक्केवारी (%) मध्ये नोंदविणे आवश्यक आहे. संच निर्धारित असलेल्या शिष्यवृत्तीसाठी लाभार्थ्यांची निवड शिष्यवृत्तींच्या अटीनुसार (उदा. टक्केवारी, उत्पन्न इ.) करण्यात येते.

०७.शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांकाचा वापर करुन अर्ज भरता येतो. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करणे आवश्यक आहे.

०८. ऑनलाईन अर्ज भरतांना काही अडचणी निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालय / शैक्षणिक संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा.

०९. विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज भरतांना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे अचूक भरुन ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरीता सादर करावी.

➢ **महाविद्यालयांसाठी सुचना:-**

१. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी प्रथम संबंधित महाविद्यालयाच्या लिपिक लॉगीनमध्ये उपलब्ध होतात.

२. संबंधित शिष्यवृत्तीचे शासन निर्णय, अटी-शर्ती, लाभ आदी बाबींचा काळजीपूर्वक अभ्यास करुन महाविद्यालयातील लिपिकांनी विद्यार्थ्यांच्या अर्जांची दक्षतापूर्वक पडताळणी करावी.

३. शिष्यवृत्तीनिहाय आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांनी पोर्टलवर अपलोड केली असल्याची खात्री करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली (जसे. अभ्यासक्रमाचे नांव, अभ्यासक्रमाचा प्रकार (अनुदानित/विनाअनुदानित) अभ्यासक्रम कालावधी, प्रवेशाबाबतची माहिती (Admission Details) टक्केवारी, शिष्यवृत्तीचे मिळणारे लाभ इ.) काळजीपूर्वक पडताळणी करणे आवश्यक आहे.

**महाविद्यालयाच्या लिपिकांनी त्यांचे लॉगीनवर आलेल्या अर्जांवर तातडीने कार्यवाही (Approve / Sent Back / Reject) करणे आवश्यक आहे.**

4. महाविद्यालयाच्या लिपिकांनी मंजूर केलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पुर्नपडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीनमध्ये उपलब्ध होतात.

5. **महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयांच्या लिपिकांप्रमाणेच विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी करुन सदर अर्जांवर तातडीने कार्यवाही (Approve / Sent Back / Reject) करणे आवश्यक आहे.**

6. **तसेच विद्यार्थ्यांच्या अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह जतन करुन ठेवण्यात यावी.**

7. **शिष्यवृत्तीच्या अटी-शर्ती पूर्ण करणारे, आवश्यक सर्व स्पष्ट दिसतील अशी कागदपत्रे अपलोड केलेले व ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती लाभाची रक्कम बरोबर दर्शविली आहे अशाच विद्यार्थ्यांचे अर्ज प्रस्तूत कार्यालयाच्या (RO Login) वर मंजूरीसाठी पाठविण्यात यावेत.**

**तसेच जे अर्ज या कार्यालयाकडून Sent Back केले जातात, अशा अर्जामधील नमूद केलेल्या शेऱ्याप्रमाणे (Remark / Reason) प्रमाणे त्रुटींची पूर्तता करण्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांना कल्पना देऊन आवश्यक ते बदल करुनच सदर अर्ज पुनश्च: या कार्यालयास पाठविण्यात यावेत.**

शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी शिष्यवृत्ती योजनांबाबतची सर्वसाधारण माहिती सर्व महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयाच्या प्रवेशव्दाराच्या दर्शनी भागावर लावण्यात यावी.

युवा दुत या संकल्पने प्रमाणे सेवा दुत ही योजना राबविण्यात यावी. यामध्ये प्रत्येक महाविद्यालयामध्ये प्राचार्य, नोडल अधिकारी, संबंधित लिपिक व त्यांच्या अधिनस्त महाविद्यालयातील तंत्रज्ञान पारंगत, सेवाभावी दोन (एक विद्यार्थी व एक विद्यार्थीनी) विद्यार्थ्यांची निवड करावी. त्यांच्या माध्यमातून सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती योजनांचे प्रभावी प्रबोधन करावे. विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांना शक्य त्या सर्व मार्गांनी मदत करणे आवश्यक आहे. शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी पदधतीने अंमलबजावणी करण्यासाठी शिष्यवृत्ती योजनांची सर्व माहिती महाविद्यालयांच्या प्रवेशव्दारावर दर्शनी जागेवर Banners लावावेत. तसेच Online / Offline बैठका, SMS, WhatsApp Message, Facebook, Twitter, Website इत्यादी सर्व माध्यमांतून विद्यार्थ्यांना माहिती देण्यात यावी. तसेच या शिष्यवृत्तीपासून एकही पात्र विद्यार्थी वंचित राहणार नाही याबाबत सर्व महाविद्यालयांनी योग्य ती दक्षता घ्यावी. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी आवश्यक कागदपत्रे (उत्पन्न दाखाला, अधिवास दाखला इ.) त्वरीत प्राप्त होण्यासाठी तहसिलदार कार्यालयामार्फत महाविद्यालयांमध्ये शिबीरांचे आयोजन करावे. आधार क्रमांक लिंकींग, अद्ययावत करणे याबाबतही जिल्हाधिकारी कार्यालयांशी संपर्क साधून त्यांच्यामार्फत महाविद्यालयांमध्ये शिबीरांचे आयोजन करावे. तसेच या शिष्यवृत्तीपासून एकही पात्र विद्यार्थी वंचित राहणार नाही याबाबत सर्व महाविद्यालयांनी योग्य ती दक्षता घ्यावी. अन्यथा याबाबत काही तक्रार उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयांची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. विजय नारखेडे)
विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रति,

1. प्राचार्य / संस्था प्रमुख,
   सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित
   कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,
   जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.
2. संचालक,
   मुंबई विद्यापीठ उपकेंद्र,
   जि. ठाणे, रत्नागिरी.

प्रत:

मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.